# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२०** **दिनांक:- २६ ऑगस्ट, २०२०**

**बातमी - १**

जळगाव दि.२६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि मुंबईस्थित कलश फार्मा यांच्यात बुधवार दिनांक २६ ऑगस्ट रोजी सामंजस्य करार करण्यात आला.

कुलगुरू प्रा.पी.पी. पाटील यांच्या प्रमुख् उपस्थितीत झालेल्या या सामंजस्य कराराच्या वेळी कलश फार्मा केमचे संचालक तुषार नेहते, प्रभारी कुलसचिव प्रा. बी.व्ही. पवार, प्रा. भुषण चौधरी, अधिष्ठाता प्रा. ए.बी. चौधरी, सहयोगी अधिष्ठाता प्राचार्य व्ही.आर. पाटील, प्रा. व्ही.व्ही. गिते, बी.पी. पाटील उपस्थित होते.

कलश फार्माचे मुख्य कार्यालय मुंबईत असून जळगाव व पालघर येथे उत्पादन प्रकल्प सुरु करण्यात आले आहेत. हर्बल उत्पादन केली जातात औषधांसाठी लागणारा कच्चा माल या प्रकल्पातून परदेशात निर्यात केला जातो. या करारामुळे संयुक्त संशोधन प्रकल्प, विशेष संशोधन प्रकल्पातील माहितीचे हस्तांतरण, विद्यापीठातील प्रयोगशाळेतील उपक्रमांचा वापर, वैज्ञानिक देवाणघेवाण होणार आहे. विद्यार्थ्यांना या कंपनीत प्रशिक्षणाचा देखील लाभ मिळून कौशल्य विकासासाठी फायदा होईल.

**बातमी - २**

जळगाव दि. २६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने कोविड – १९ महामारी काळात विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावण्यासाठी विविध विषयांवर ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले.

टाळेबंदीच्या काळात शिक्षणासोबत रोजगाराच्या संधी कमी झाल्या मुळे अनेकांना नैराश्य येण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी या विभागाकडून विविध विषयांवर वेबिनारच्या माध्यमातून तज्ञ व्यक्तिंचे मार्गदर्शन लाभले. यजुवेंद्र महाजन यांनी स्वयंदिप बनू या विषयावर व्याख्यान दिले. व्य.प. सदस्य दीपक पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रा. सुरेश पांडे यांनी कोरोना काळ व भविष्यातील रोजगाराच्या वाटा या विषयावर मार्गदर्शन केले. प्रा. भुषण चौधरी अध्यक्षस्थानी होते. तिसऱ्या सत्रात पंडीत दिनदयाळ उपाध्याय अध्यासन विभागाचे प्रमुख व प्रभारी वित्त लेखाधिकारी डॉ. विवेक काटदरे यांनी कोरोना काळ व ताणतणाव व्यवस्थापन या विषयावर विचार मांडले. व्य.प. सदस्य विवेक लोहार अध्यक्षस्थानी होते. या वेबिनारचे प्रास्ताविक विभागाचे प्रभारी संचालक प्रा. मनिष जोशी केले, सुभाष पवार यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

---

प्रति,

मा.संपादक/ प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनिल पाटील)

जनसंपर्क अधिकारी